आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३१ मे २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातल्या ५७ जागांसाठी उद्या मतदान
- गेल्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ८ पूर्णांक २ दशांश टक्के
- राज्य लोकसेवा आयोगाच्या पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल जाहीर

**आणि**

- राज्यातल्या विविध जल प्रकल्पात २२ पूर्णांक सहा शतांश टक्के पाणीसाठा

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या एकंदर ५७ लोकसभा मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकरीत्या पार पडावी यासाठी निवडणूक आयोगानं सर्व तयारी केली आहे. उष्णतेच्या लाटेचा विचार करता मतदारांना आणि निवडणूक कर्मचाऱ्यांना त्रास होऊ नये यासाठी आवश्यक त्या सूचना निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

या सातव्या टप्प्यात पंजाब आणि उत्तर प्रदेशातल्या प्रत्येकी १३, बिहारमधल्या ८, ओदिशातल्या ६, हिमाचल प्रदेशातल्या ४, झारखंडमधल्या ३ आणि चंडीगडच्या एका जागेसाठी मतदान होणार आहे. तसंच ओदिशा विधानसभेच्या उर्वरित ४२ जागांसाठीचं मतदानही उद्या पार पडणार आहे. सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात होईल.

लोकसभा निवडणुकीच्या या शेवटच्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकुर, भाजपाचे ज्येष्ठ नेते रविशंकर प्रसाद,

काँग्रेसचे मनीष तिवारी, विक्रमादित्य सिंह, राष्ट्रीय जनता दलाच्या नेत्या मीसा भारती आणि तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांच्यासह अनेक दिग्गजांचं भविष्य मतपेटीत बंद होईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या काळात प्राप्तीकर विभागानं एक हजार १०० कोटी रुपयांची रक्कम आणि दागिने जप्त केले आहेत. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी ३९० कोटी रुपये जप्त केले होते. त्या तुलनेत हे प्रमाण १८२ टक्क्यांनी जास्त असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**<><><><><>**

मतमोजणीच्या दिवशी ताज्या निकालांच्या बातम्या देण्यासाठी आकाशवाणी मुंबईचा प्रादेशिक वृत्त विभाग सकाळी ९ वाजल्यापासून निवडणूक विशेष बातमीपत्र प्रसारित करणार आहे. तसंच निकालांचं सर्वंकष विश्लेषण करणारा चर्चात्मक कार्यक्रम निवाडा जनतेचा सकाळी ९ वाजून पाच मिनिटांपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सादर करण्यात येईल.

**<><><><><>**

देशाचा स्थिर मूल्याधारित जीडीपी वाढीचा दर २०२३- २४ या वर्षात ८ पूर्णांक २ दशांश टक्के राहिला. केंद्रसरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने आज जाहीर केलेल्या आकडेवारीत ही माहिती दिली आहे. २०२२ – २३ या आर्थिक वर्षात हा दर ७ टक्के नोंदला गेला होता. २०२३-२४ या वर्षात स्थिर मूल्याधारित जीडीपी १७३ लाख कोटी रुपयांच्या वर जाईल

असा अंदाज आहे. तर चालू मूल्याधारित जीडीपी २९५ लाख कोटी रुपयांच्या वर जाईल असा अंदाज आहे.

**<><><><><>**

वीज ग्राहकांना बिलाबाबत पारदर्शी आणि अचूक सेवा मिळण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या, स्मार्ट मीटर बसवण्याला महावितरणने स्वतःपासून सुरुवात केली आहे. महावितरणची विदर्भातली १८ कार्यालयं आणि कर्मचारी निवासस्थानामधील ३२३ सदनिका, अशा एकूण ३४१ वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. राज्यात कृषी ग्राहक वगळता, सर्व ग्राहकांच्या कार्यालय अथवा निवासस्थानी विजेचे स्मार्ट मीटर बसवण्यात येणार आहेत. वीज ग्राहकांना महावितरणकडून स्मार्ट मीटर मोफत मिळणार असून, दहा वर्षे या मीटरच्या देखभाल दुरुस्ती करण्याचं काम संबंधित कंपन्यांवर बंधनकारक असणार आहे.

**<><><><><>**

राज्य लोकसेवा आयोगानं पोलीस उपनिरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल आज जाहीर केला. राज्यात अजय कळसकर यानं पुरुष उमेदवारांमध्ये प्रथम तर, मयुरी सावंत हिनं महिलांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा २०२१ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची शिफारस यादी खेळाडू उमेदवार वगळून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. खेळाडू प्रवर्गातून अर्ज भरलेल्या उमेदवारांच्या संबंधित काही तक्रारी आयोगाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे या तक्रारींची पडताळणी करून खेळाडू प्रवर्ग सोडून उर्वरित ९५८ पदांसाठीचा निकाल गुरुवारी जाहीर करण्यात आला आहे. खेळाडू उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्यानंतर सर्व उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील

गुणांची पडताळणी करण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात येईल असं आयोगानं स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, राज्य सरकारच्या विविध विभागातल्या ५२४ रिक्त पदं भरण्यासाठी, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी, महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा, ६ जुलै ऐवजी, येत्या २१ जुलै रोजी घेण्यात येणार असल्याची घोषणा आयोगाकडून काल करण्यात आली आहे.

**<><><><><>**

मध्य रेल्वेच्या सीएसएमटी आणि ठाणे स्थानकात ६३ तासांच्या विशेष मेगाब्लॉकचा परिणाम रेल्वेसेवेवर झाला असून चाकारमान्यांना अडचणींना सामोरं जावं लागत आहे. मुंबईत गुरुवारी मध्यरात्रीपासून तीन दिवस ९५३ लोकल आणि ७२ मेल एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत. या ब्लॉकदरम्यान पर्यायी व्यवस्था म्हणून एसटी महामंडळानं आणखी ५० बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे.

सीएसएमटी ते ठाणे स्थानकादरम्यान धीम्या मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू असून, ते लवकरच पूर्ण होईल. प्रवाशांनी सहकार्य करावं असं  आवाहन मध्य रेल्वेनं केलं आहे.

**<><><><><>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षाला आज पासून प्रारंभ झाला. अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम होत आहेत.

राज्यपाल रमेश बैस यांनी मुंबईत राजभवनातील अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच देवेंद्र

फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अहिल्याबाई होळकरांना समाज माध्यमांवर आदरांजली वाहिली आहे. राज्याचे अन्न,नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनीही अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले. मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये यानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. काल पारंपरिक गजीनृत्याचं, तसंच ‘मी अहिल्या बोलतेय’, या नाट्यप्रयोगाचं सादरीकरण झालं. रत्नागिरी इथं जिल्हाधिकारी यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहीली.

**<><><><><>**

दक्षिणेतल्या बेंगलोर रोझ कांद्यावरचं ४० टक्के शुल्क हटवल्यानं लासलगाव इथल्या खाजगी बाजार समितीत आज सकाळी कांद्याचे लिलाव सुरू होताच कांद्याच्या बाजार भावात २०० रुपयांची घसरण झाली. त्यावर संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांद्याचे लिलाव काही काळासाठी बंद पाडले.

या वेळी ५५० मेट्रिक टन मूल्य आणि ४० टक्के कांद्यावरचं शुल्क हटवण्याची मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली. येत्या आठ दिवसांत कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्क न हटवल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या मोठे, मध्यम आणि लघु अशा एकूण दोन हजार ९९७ प्रकल्पात सध्या केवळ २२ पूर्णांक सहा शतांश टक्के इतका पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी राज्यातल्या एकूण पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाली असून, अनेक भागात भीषण पाणीटंचाई जाणवत आहे.

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये केवळ ८ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. मुंबईत येत्या ५ तारखेपासून १० टक्के पाणी कपातीचा निर्णय महानगर पालिकेनं घेतला आहे.

**<><><><><>**

सलग पाच दिवसांच्या घसरणीनंतर शेअरबाजार आज थोडा सावरला. दिवसाच्या सुरुवातीपासूनच तेजीत असलेला शेअरबाजार मोठ्या घसरणीनंतरही दिवसअखेर चढा राहिला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ७५ अंकांनी वधारून ७३ हजार ९६१ अंकांवर बंद झाला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ४२ अंकांनी वधारून २२ हजार ५३१ अंकांवर बंद झाला.

**//<><><><><>//**